जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ०६ दिनांक - ०३/०१/२०२४**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# सुरज ऊर्फ चुस बाळु मोहीते (टोळी प्रमुख) व त्यांचे १५ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक १८/१२/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांच्या राहत्या घरात असताना परिसरात राहणारे अनिकेत पाटोळे, रवि पाटोळे, आदित्य पाटोळे, लखन मोहिते, सुरज ऊर्फ चुस मोहिते, तुषार ऊर्फ बाळु मोहिते, सचिन खंडाळे, ओमकार देढे, पंकज कांबळे, गौरव झाटे, हसनेल अली शेनागो हे तोंडाला रुमाल बांधुन हातात धारदार शस्त्र घेवुन त्यांच्या घराच्या बाहेर आले व यापुर्वी दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरुन फिर्यादीला शिवीगाळ करुन तुला आता जिवंत सोडत नाही अशी धमकी देवुन फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याच्या इराद्याने त्याच्या हातातील लोखंडी धारदार शस्त्राने वार करुन,दगड मारुन जखमी केले. तसेच सदर भागातील दुकानातील काऊंटरच्या काचा, बाहेर पार्क केलेली दुचाकी व चारचाकी वाहने, लोखंडी हत्याराने मारुन, तोडुन नुकसान केले. तसेच लोखंडी धारदार शस्त्र हवेत फिरवत सदर भागात दहशत निर्माण केली म्हणुन त्यांच्याविरुध्द फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने **हडपसर पो.स्टे.गु.र.नं.१९१५/२०२३,भादंवि कलम ३२४,४२७,१४३,१४४,१४५,१४८,१४९,५०४,५०६,कलम वाढ ३०७ सह महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७(१)(३)सह १३५ प्रमाणे,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेन्डमेन्ट ॲक्ट कलम ०३ व ०७** प्रमाणे प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयाच्या तपासा दरम्यान सदरचा गुन्हा हा आरोपी नामे **(१)सुरज ऊर्फ चुस बाळु मोहीते,वय-२२ वर्षे,रा.वैदवाडी,हडपसर,पुणे (टोळी प्रमुख) पाहिजे आरोपी (२)अनिकेत रविंद्र पाटोळे,वय-२३ वर्षे,रा.वैदवाडी,हडपसर,पुणे ३)आदित्य रविंद्र पाटोळे,वय-२० वर्षे,वैदवाडी,हडपसर,पुणे ४)तुषार बाळु मोहिते,वय-१९ वर्षे,वैदवाडी,हडपसर,पुणे ५)नवनाथ ऊर्फ लखन बाळु मोहिते,वय-१९ वर्षे,वैदवाडी, हडपसर, पुणे ६)हासनेल अली शेनागो,वय- १९ वर्षे,वैदवाडी, हडपसर,पुणे ७)गौरव विजय झाटे,वय-१९ वर्षे, रा.रामटेकडी,हडपसर,पुणे ८)ओमकार मारुती देढे, वय- १९ वर्षे, रा.रामटेकडी, हडपसर, पुणे. ९)पंकज विठ्ठल कांबळे,वय-२० वर्षे,रा.वैदवाडी,हडपसर,पुणे १०)रविंद्र बाबुराव पाटोळे वय-४६ वर्षे,रा.वैदवाडी, हडपसर,पुणे (टोळी सदस्य) (११)सचिन मारुती खंडाळे,वय-२५ वर्षे,रा.वैदवाडी,हडपसर,पुणे (टोळी सदस्य,पाहिजे आरोपी**) अ.क्र.२ ते १० यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे, तसेच विधी संघर्षित ०५ बालक हे ताब्यात असुन अ.क्र.१ व ११ हे पाहिजे आरोपी आहेत.

आरोपी सुरज ऊर्फ चुस बाळु मोहीते याने साथीदारासह दाखल गुन्हा हा हिंसक मार्गाचा अवलंब करुन स्वतःचे व स्वतःच्या टोळीचे वर्चस्व /दहशत रहावी म्हणुन व स्वतःच्या व इतरांसाठी गैरवाजवी अवैध मार्गाने आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्यासाठी तसेच नागरीकांच्या मनात भिती निर्माण करण्याकरीता केलेला असल्याचे तपासात निष्पन्न होत असल्याने त्यांचे विरूध्द बेकायदेशिर शस्त्र बाळगणे,दूखापत करणे असे गुन्हे दाखल असुन.त्यांचे विरूध्द प्रतिबंधक कारवाई करून सुध्दा त्यांनी पुन्हा-पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटित दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थीक फायद्याकरीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम-३(१)(ii),३(२),३(४)चा अंतर्भाव करणेची महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम-२३(१)(अ) प्रमाणे पुर्वमान्यता मिळणे कामी हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रविंद शेळके यांनी पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ-५ पुणे शहर, आर, राजा यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी हडपसर पो.स्टे.गु.र.नं.१९१५/२०२३,भादंवि कलम ३२४,४२७,१४३,१४४, १४५, १४८,१४९,५०४,५०६,कलम वाढ ३०७ सह महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७(१)(३)सह १३५ प्रमाणे,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेन्डमेन्ट ॲक्ट कलम ०३ व ०७ चा अंतर्भाव करणे बाबत मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे शहर श्रीमती अश्वीनी राख, ह्या करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे (मा.पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार) श्री.रामनाथ पोकळे मा.अपर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त सो. परीमंडळ-५ पुणे शहर श्री. आर, राजा, सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे शहर, अश्विनी राख, त्यांचे मार्गर्शनाखाली हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रविंद शेळके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. विश्वास डगळे, श्री.संदिप शिवले म.सहा.पोलीस निरीक्षक सारिका जगताप, पोलीस उप-निरीक्षक महेश कवळे, निगराणी पथकातील पोलीस अंमलदार प्रविण शिंदे, महेश उबाळे, राजश्री खैरे, वसीम सय्यद, हनुमंत झगडे गिरीश एकोर्गे, बाबासाहेब शिंदे, यांनी केलेली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईन लक्ष देवुन,शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही १०९ वी कारवाई आहे.**